# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.०६/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-१७ डिसेंबर, २०२१

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (संबंधित).

विषय:- राज्यातील नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२१-२२ नगरपंचायतींच्या निवडणुकांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांच्या आरक्षणाबाबत...

संदर्भ:- १) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र.८४१/२०२१, विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ व रिट याचिका क्र.१३१६/२०२१ मधील दि.१५/१२/२०२१ रोजीचा निर्णय.
२) आयोगाचा समक्रमांकाचा दि.२४/११/२०२१ अन्वये दिलेला निवडणूक कार्यक्रम.
३) आयोगाचा समक्रामांकाचा दि.३०/११/२०२१ चा निवडणूक कार्यक्रम.
४) आयोगाचे समक्रमांकाचे दि.०७/१२/२०२१ चे पत्र.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.६, दि.०१/१०/२०२१ अन्वये नगरपरिषदा/ नगरपंचायतींमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी २७ टक्क्यांपर्यंत आरक्षण देण्याची तसेच एकूण आरक्षण हे नगरपरिषदा/ नगरपंचायतींमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही, अशी तरतूद करण्यात आली आणि त्यास अनुसरून राज्य निवडणूक आयोगाने दि.२४/११/२०२१ रोजी १०५ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता निवडणूक कार्यक्रम व दि.३०/११/२०२१ रोजी एका नगरपंचायतीचा सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम निर्गमित केला. ज्यामध्ये सदर अध्यादेशातील तरतुदीनुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी जागा आरक्षित करण्यात आल्या होत्या.

आणि ज्याअर्थी, विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ व रिट याचिका क्र.१३१६/२०२१ अन्वये सदर दोन्ही अध्यादेशांना मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात

आले. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०६/१२/२०२१ रोजीच्या आदेशानुसार सद्यस्थितीत सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेतील नागरिकाच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित करण्यात आलेल्या जागांच्या निवडणुकींना स्थगिती दिली. त्यानुसार दि.०७/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये आयोगाने या सर्व सार्वत्रिक निवडणुकांमधील नागरिकाच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित केलेल्या जागांच्या निवडणुका तात्काळ स्थगित केल्या. तथापि, मा. सवोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उपरोक्त निवडणुकांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व खुल्या जागांसाठी होणाऱ्या निवडणुका पुढे सुरू ठेवण्यात आल्या.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने संदर्भाधीन रिट याचिकेमध्ये दि.१५/१२/२०२१ रोजीच्या सुनावणीनंतर पारित केलेल्या आदेशामध्ये राज्य निवडणूक आयोगाला असे स्पष्ट निर्देश दिले आहेत की, सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेमधील नागरिकाच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित करण्यात आलेल्या ज्या जागांची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे, त्या जागा तत्काळ अनारक्षित करून सर्वसाधारण प्रवर्गातून भरण्यात याव्यात.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर निकालामध्ये असेही स्पष्ट केले आहे की, राज्य निवडणूक आयोग या अनारक्षित झालेल्या नागरीकांच्या मागास प्रवर्गाच्या जागांच्या निवडणुकांचा कार्यक्रम एका आठवड्यात जाहीर करेल आणि या अनारक्षित जागांचा निकाल हा सद्या सुरु असलेल्या अन्य जागांसाठीच्या निवडणुकांच्या निकालासोबत एकत्रित जाहीर करेल.

आणि त्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने संदर्भाधीन क्र. १ अन्वये दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने संदर्भाधीन क्र. २, ३ व ४ अन्वये जाहीर केलेल्या सार्वत्रिक निवडणुकांबाबत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

## आदेश

१) राज्य निवडणूक आयोगाने वरील परिच्छेद १ मधील नमूद सर्व सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमाकरीता अधिसूचित करण्यात आलेल्या नागरीकांच्या मागास प्रवर्गाच्या सर्व आरक्षित जागा या तात्काळ अनारक्षित करण्यात आल्याचे याद्वारे जाहीर करण्यात येत आहे.

२) वर नमूद केल्यानुसार मुलत: नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित असलेल्या ज्या जागा सर्वसाधारण प्रवर्गाच्या होतील, त्या जागांपैकी

सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित ठेवावयाच्या जागा या आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या तत्वानुसार कोणत्या प्रभागात देय होतील हे निश्चित करण्यात यावे.

३) आवश्यकतेनुसार सदर जागांचे महिलांकरिता आरक्षण निश्चित करण्याकरिता सोडत प्रक्रिया राबविण्यात यावी. सोडत प्रक्रियेमध्ये सर्वसाधारण झालेल्या जागांपैकी कोणत्या जागा सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित होतील हे निश्चित करण्यात यावे.

४) सोडतीनंतर त्यानुसार महिलांकरिता सुधारीत आरक्षण अधिसूचित करण्यात यावे व त्यास योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

५) सार्वत्रिक निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच सर्वसाधारण पदांकरिता सुरु असलेल्या कार्यक्रमानुसार होणारी मतमोजणी पुढे ढकलण्यात येत असून त्या निवडणुकांची मतमोजणी आता दि.१९/०१/२०२२ रोजी होईल.

६) मतमोजणी पुढे ढकललेल्या ठिकाणी मतपेट्या सुरक्षित ठिकाणी, योग्य त्या पोलीस बंदोबस्तात ठेवण्यासाठी योग्य ती सर्व कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावयाची आहे.

७) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे अनारक्षित करण्यात आलेल्या जागा या सर्वसाधारण/ सर्वसाधारण महिलाकरीता अधिसुचित करुन भरण्याचा आणि एकत्रित निकाल जाहीर करण्याचा सुधारीत कार्यक्रम परिशिष्ट-३ मधील नगरपंचायतींसाठी या पत्रासोबतच्या परिशिष्ट-१ व २ नुसार आयोग जाहीर करीत आहे.

८) सदरील कार्यक्रमास योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी.

९) सदर सुधारीत कार्यक्रमानुसार सद्या सुरू असलेल्या आचारसंहितेचा कालावधी हा मतमोजणीच्या सुधारीत दिनांकापर्यंत लागू राहील.

१०) राज्यामध्ये कोरोना विषाणूची (कोविड-१९) महामारी सुरू असल्याने, केंद्र व राज्य शासनाने ठरवून दिलेल्या निकषांचे तंतोतंत पालन करून नगरपंचपायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम राबवितेवेळी आवश्यक त्या उपाययोजना राबविण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:-

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग.
४. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव ,(२)नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८. विभागीय आयुक्त (सर्व).
९. संबंधित जिल्हा पोलीस अधीक्षक.
१०. संबंधित नगरपंचायतींचे प्रशासक व मुख्याधिकारी.
११. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई.
१२. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने.
१३. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.
१४. निवड नस्ती/कार्या-६.

# परिशिष्ट-१

**माहे एप्रिल-२०२० ते मे, २०२१ या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या एकूण ८२ नगरपंचायती आणि माहे डिसेंबर २०२१ मध्ये मुदत समाप्त होणाऱ्या १८ आणि ६ नवनिर्मित अशा एकूण १०६ नगरपंचायतींच्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१५/१२/२०२१ च्या आदेशानुसार ना.मा.प्र. करिता आरक्षित असलेल्या ज्या जागा सर्वसाधारण प्रवर्गाच्या होतील, त्या जागांपैकी सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित ठेवावयाच्या जागांसाठी सुधारीत फेर सोडतीचा कार्यक्रम-२०२१**

(राज्य निवडणूक आयोगाचा आदेश क्र.रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.६/का-०६, दि.१७/१२/२०२१ सोबतचे परिशिष्ट.)

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | सदस्य पदांच्या ना.मा.प्र. व ना.मा.प्र. महिला आरक्षणाऐवजी सर्वसाधारण/ सर्वसाधारण महिला प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित करण्यासाठी नोटीस प्रसिध्द करणे **(जिल्हाधिकारी नगरपंचायतीच्या वेबसाईटसह)** | जिल्हाधिकारी | २०/१२/२०२१ (सोमवार) |
| २. | नगरपंचायतीच्या सदस्य पदांच्या ना.मा.प्र. व ना.मा.प्र. महिला आरक्षणाच्या ऐवजी सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांची सोडत काढणे. (मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१५/१२/२०२१ च्या आदेशानुसार) | मुख्याधिकारी | २३/१२/२०२१ (गुरूवार) |
| ३. | आरक्षण व सोडतीचा अहवाल संबंधित विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, यांचेकडे पाठविणे. | जिल्हाधिकारी | २४/१२/२०२१ (शुक्रवार) पर्यंत |
| ४. | नगरपंचायतीच्या सदस्य पदांच्या ना.मा.प्र. व ना.मा.प्र. महिला आरक्षणाच्या ऐवजी सर्वसाधारण/ सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांच्या अंतिम आरक्षणास मान्यता देणे. | संबंधित विभागीय आयुक्त | २७/१२/२०२१ (सोमवार) पर्यंत |
| ५. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना वृत्तपत्रात व स्थानिक पातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपंचायतींच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | २८/१२/२०२१ (मंगळवार) पर्यंत |

टीपः- सोडत काढण्यात येणाऱ्या नगरपंचायतीच्या आरक्षण व सोडत इत्यादी ते अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# परिशिष्ट -२ सार्वत्रिक निवडणुकांसाठी

**(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.६/का.६,दि.१७/१२/२०२१ सोबतचे सहपत्र.)**

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१५/१२/२०२१ च्या आदेशानुसार ना.मा.प्र. करिता आरक्षित असलेल्या जागा अनाक्षित करण्यात आलेल्या असून अशा एकूण **१०६ नगरपंचायतींच्या सोबतच्या परिशिष्ट- ३ मधील नमूद** सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२१-२२.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/संपविण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | २८/१२/२०२१ (मंगळवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी. | २९/१२/२०२१ (बुधवार) सकाळी ११.०० ते ०३/०१/२०२२ (सोमवार) दुपारी ०२.०० पर्यंत |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | २९/१२/२०२१ (बुधवार) ते ०३/०१/२०२२ (सोमवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत) दि.०१/०१/२०२२ शनिवार व दि.०२/०१/२०२२ रविवार या सुट्टींच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत. |
| ४ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०४/०१/२०२२ (मंगळवार) सकाळी ११.०० वाजल्यापासुन |
| ५ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपील नसेल तेथे | १०/०१/२०२२ (सोमवार) दुपारी ०३.०० वाजेपर्यंत |
| ५-अ | अपील असल्यास<br>(i) वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, जिल्हा न्यायाधिशाकडे अपिल करता येईल.<br>(ii) निवडणूक निर्णय अधिकारी यानी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत. | अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी. |
| ६ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी |
| ७ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | १८/०१/२०२२ (मंगळवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ८ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | १९/०१/२०२२ (बुधवार) सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| ९ | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | कलम १९ मधील तरतुदीनुसार |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

| परिशिष्ट -३ | | | |
|---|---|---|---|
| (राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.६/का.६, दि.१७/१२/२०२१ सोबतचे सहपत्र.) | | | |
| अ.क्र. | जिल्हा | अ.क्र. | नगरपंचायतीचे नावे |
| १ | ठाणे | १ | मुरबाड |
| | | २ | शहापूर |
| २ | पालघर | ३ | तलासरी |
| | | ४ | विक्रमगड |
| | | ५ | मोखाडा |
| ३ | रायगड | ६ | खालापूर |
| | | ७ | तळा |
| | | ८ | माणगाव |
| | | ९ | म्हसळा |
| | | १० | पोलादपूर |
| | | ११ | पाली |
| ४ | रत्नागिरी | १२ | मंडणगड |
| | | १३ | दापोली |
| ५ | सिंधुदुर्ग | १४ | कसई-दोडामार्ग |
| | | १५ | वाभवे-वैभववाडी |
| | | १६ | कुडाळ |
| | | १७ | देवगड-जामसंडे |
| ६ | पुणे | १८ | देहू |
| ७ | सातारा | १९ | लोणंद |
| | | २० | कोरेगांव |
| | | २१ | पाटण |
| | | २२ | वडूज |
| | | २३ | खंडाळा |
| | | २४ | दहीवडी |
| ८ | सांगली | २५ | कडेगाव |
| | | २६ | खानापूर |
| | | २७ | कवठे-महाकाळ |
| ९ | सोलापूर | २८ | माढा |
| | | २९ | माळशिरस |
| | | ३० | महाळुंग-श्रीपूर |
| | | ३१ | वैराग |
| | | ३२ | नातेपुते |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | नाशिक | ३३ | निफाड |
| | | ३४ | पेठ |
| | | ३५ | देवळा |
| | | ३६ | कळवण |
| | | ३७ | सुरगाणा |
| | | ३८ | दिंडोरी |
| ११ | धुळे | ३९ | साक्री |
| १२ | नंदुरबार | ४० | धडगाव-वडफळ्या-रोषणमाळ |
| १३ | अहमदनगर | ४१ | अकोले |
| | | ४२ | कर्जत |
| | | ४३ | पारनेर |
| | | ४४ | शिर्डी |
| १४ | जळगांव | ४५ | बोदवड |
| १५ | औरंगाबाद | ४६ | सोयगांव |
| १६ | जालना | ४७ | बदनापूर |
| | | ४८ | जाफ्राबाद |
| | | ४९ | मंठा |
| | | ५० | घनसावंगी |
| | | ५१ | तिर्थपुरी |
| १७ | परभणी | ५२ | पालम |
| १८ | बीड | ५३ | केज |
| | | ५४ | शिरुर-कासार |
| | | ५५ | वडवणी |
| | | ५६ | पाटोदा |
| | | ५७ | आष्टी |
| १९ | लातूर | ५८ | जळकोट |
| | | ५९ | चाकुर |
| | | ६० | देवणी |
| | | ६१ | शिरुर-अनंतपाळ |
| २० | उस्मानाबाद | ६२ | वाशी |
| | | ६३ | लोहारा बु. |
| २१ | नांदेड | ६४ | नायगाव |
| | | ६५ | अर्धापूर |
| | | ६६ | माहूर |
| २२ | हिंगोली | ६७ | सेनगाव |
| | | ६८ | औंढा-नागनाथ |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | अमरावती | ६९ | भातकुली |
| | | ७० | तिवसा |
| २४ | बुलढाणा | ७१ | संग्रामपूर |
| | | ७२ | मोताळा |
| २५ | यवतमाळ | ७३ | महागाव |
| | | ७४ | कळंब |
| | | ७५ | बाभुळगाव |
| | | ७६ | राळेगाव |
| | | ७७ | मारेगाव |
| | | ७८ | झरी जामणी |
| २६ | वाशिम | ७९ | मानोरा |
| २७ | नागपूर | ८० | हिंगणा |
| | | ८१ | कुही |
| २८ | वर्धा | ८२ | कारंजा |
| | | ८३ | आष्टी |
| | | ८४ | सेलू |
| | | ८५ | समुद्रपूर |
| २९ | भंडारा | ८६ | मोहाडी |
| | | ८७ | लाखनी |
| | | ८८ | लाखांदूर |
| ३० | गोंदिया | ८९ | सडकअर्जुनी |
| | | ९० | अर्जुनी |
| | | ९१ | देवरी |
| ३१ | चंद्रपूर | ९२ | सावली |
| | | ९३ | पोंभुर्णा |
| | | ९४ | गोंडपिपरी |
| | | ९५ | कोरपना |
| | | ९६ | जिवती |
| | | ९७ | सिंदेवाही-लोनवाही |
| ३२ | गडचिरोली | ९८ | मुलचेरा |
| | | ९९ | एटापल्ली |
| | | १०० | कोरची |
| | | १०१ | अहेरी |
| | | १०२ | चामोर्शी |
| | | १०३ | सिरोंचा |
| | | १०४ | धानोरा |
| | | १०५ | कुरखेडा |
| | | १०६ | भामरागड |
| | **एकूण** | | **१०६** |